# आंबेडकरी चळवळीतील स्त्रियांचे वैचारिक योगदान (१९२० ते १९५६)

**ज्योती अमित वराळे** संशोधक विद्यार्थी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ई-मेल-jyotivarale@gmail.com
**मार्गदर्शक प्रा. डॉ. अरुण शिंदे** नाईट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स, कोल्हापूर.

---

**प्रस्तावना**

मानवी जीवनात सर्वस्तरीय समता प्रस्थापित करून बंधुत्वाचा विचार पेरत जाणारी चळवळ म्हणजे आंबेडकरी चळवळ होय. 'शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे आणि तो घेणारा गुरगुरलाच पाहिजे' असे शिक्षणाविषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले आहे. मग शिक्षण घेणारा पुरुष असो वा स्त्री. प्रत्येक मानवाच्या उज्वल भवितव्यासाठी शिक्षण अत्यावश्यक आहे. भारतासारख्या पुरुषप्रधान संस्कृतीत पूर्वी जिथे समाजातील सर्व वर्गांनाच शिक्षण मिळणे दुरापास्त होते तिथे स्त्री शिक्षणाचा विचार करणे ही खूप धाडसाची गोष्ट होती. मूलतः कोणतीही स्त्री अस्पृश्य समजली जात असताना अस्पृश्य, मागास समजलेल्या जातीतील स्त्रियांची स्थिती काय वर्णावी? डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राष्ट्राच्या सर्वंकष प्रगतीसाठी समाजातील शूद्र समजलेल्या जातींचे उत्थान करणे हेच आपले जीवितध्येय मानले.

समाजात समता, बंधुता आणि मानवतेचा पुरस्कार करणारी आंबेडकरी चळवळ त्यांच्या योगाने दृष्टिक्षेपात आली. या चळवळीने मानवी हक्कांसाठी लढा दिला, अनेक सत्याग्रह केले. या सत्याग्रहात पुरुषांच्या बरोबरीने अनेक स्त्रियांनीही आपले योगदान दिले. 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' अशी त्रिसूत्री बाबासाहेबांनी समाजाला दिली. ते म्हणत, "तुम्ही सर्वप्रथम शिक्षित व्हा. आपल्या मुला मुलींना शिकवा, त्यामुळे देशाचा विकास होईल, तुमच्या अस्मितेचाही. तुम्ही पण माणूस आहात अशी तुम्हाला ओळख होईल." तसेच 'स्त्रियाच अस्पृश्य वर्गाची प्रगती घडवून आणू शकतात त्यासाठी त्यांच्यात जागृती झाली पाहिजे' असाही संदेश ते देत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा हा संदेश प्रमाण मानून अनेक स्त्रिया शिक्षित झाल्या आणि अज्ञानाने दारिद्र्यात, गुलामगिरीत पिचत पडलेल्या समाजाला जागृत करण्याचे महान कार्य करू लागल्या. त्यामधील लक्ष्मी थोरात, शिवूबाई जाधव, तुळसाबाई बनसोड शांताबाई दाणी, जाईबाई चौधरी, सुलोचनाबाई डोंगरे, विठाबाई काळे व अशा अनेक महिला कार्यकर्त्यांचा समावेश होतो. ज्यांनी अस्पृश्य महिलांमध्ये आत्मसन्मानाची ज्योत जागृत करण्याचे महान कार्य केले आहे. त्यांचे वैचारिक कार्य आपण विस्ताराने पाहू

**लक्ष्मी श्रीपतराव थोरात** –

अस्पृश्य समाजातील महत्त्वाचे कार्यकर्ते शिवराम जानबा कांबळे यांनी अस्पृश्य समाजाच्या प्रबोधनपर 'सोमवंशीय मित्र' हे मासिक १९०९ रोजी सुरू केले होते. त्यांच्या या कार्यात अनेक अस्पृश्य महिलांचाही सहभाग असे. बडोदा संस्थानचे राजे सयाजीराव गायकवाड यांना मानपत्र देतेवेळी या अस्पृश्य समाजातील स्त्रियाही बडोद्यास उपस्थित होत्या. त्यामध्ये मंजुळाबाई कृष्णाजी शाळीग्राम, विठाबाई सदाशिव शाळीग्राम, तानुबाई शिवराम जानबा कांबळे, सावित्रीबाई श्रीपती थोरात, शिवराम जानबा कांबळे यांची कन्या शेवंतीबाई मारुती भोसले, शिवूबाई गायकवाड, साळुबाई भालेराव, कोंडाबाई साबळे, कृष्णाबाई हनुमंत, अहिल्याबाई जगताप इत्यादी स्त्रिया बडोदा संस्थानातील महाराणी मातोश्री साहेबांच्या दर्शनास गेल्या. त्यावेळी श्री. कृष्णाजी दामाजी शाळीग्राम मेहेतरे यांनी तयार केलेली पदे त्यांच्या लहान पुतण्यांनी महाराणी साहेबांना गाऊन दाखवली. यावेळी महाराणी साहेबांनी स्त्री शिक्षणाची गरज निकडीची असल्याचे प्रतिपादन सर्वांसमोर केले.

श्रीपतराव थोरात यांच्या मुलीने लक्ष्मीने महाराणी साहेबांना पुष्पहार अर्पण केला आणि "श्री मातोश्री महाराणी साहेब आपण आम्हा अति मागासलेल्यांना जो दर्शनसुखाचा अलभ्य लाभ दिला याबद्दल आम्ही आपले उपकार विसरणार नाही. या लहान मुलांचे भाषण ऐकून महाराणी सरकारांनी हास्यवदन केले, जसे श्रीमंत महाराज साहेबांचे आमच्याकडे लक्ष आहे, तसेच त्यांच्या महाराणी साहेबांचेही आमच्याकडे आहे याबद्दल समस्त सोमवंशीय जातीचे वतीने महाराणी साहेबांचे प्रसिद्धीने अत्यंत कृतज्ञ बुद्धीपूर्वक फार- फार उपकार मानतो."१ अशाप्रकारे अस्पृश्य समाजातील स्त्रिया ज्या त्यांच्या हालाखीच्या स्थितीमुळे घराबाहेर पडू शकत नसत. त्या एका थोर संस्थानिकांच्या महाराणी साहेबांची भेट घेऊन आपले मनोगत व्यक्त करतात हे अस्पृश्य वर्गातील स्त्री सुधारणेचे एक पाऊलच म्हणावे लागेल.

**शिवूबाई जाधव** –

शिवराम जानबा कांबळे हे 'सोमवंशीय मित्र' मधून समाजातील जुन्या वाईट चालीरीतींवरही कठोर प्रहार करत होते. मुरळी प्रथेविरोधात 'सोमवंशीय मित्र' मधून १ जुलै १९०८ रोजी लिहिलेला 'मुरळ्या' हा लेख प्रसिद्ध झाला. या लेखातील आशय शिवूबाई या मुरळीला कळताच तिच्या जीवनात आशेचे चित्र उमटल्याचे तिने पत्रातून विषद केले. ती मुरळी म्हणजे शिवूबाई

जाधव होय. शिवूबाईने मुरळी जीवनाचे जळजळीत वास्तव या पत्रातून मांडलेले आहे. त्यामध्ये ती म्हणते, "महाराज आपल्या सोमवंशीय जातीमध्ये वडिलांच्या भोळ्या समजुतीमुळे पडलेली जी शतूक चाल, त्या चालीस अनुसरण ज्या आई बापाने आपल्या पोस्टच्या मुली मोठ्या आनंदाने खंडोबा देवास अर्पण केल्या आहेत व अक्षय दुःख भोगावयास लावले आहे. ते जर या आपल्या बोधपर लेखाचा विचार करतील, तर आम्ही खऱ्या सुखास आंतरलेल्या अबलांचा यापुढे तरी शेवट गोड होऊन आम्ही जगनिंद्येच्या भयंकर कचाट्यातून मुक्त होऊ यात संशय नाही."२ या पत्रात शिवूबाई जाधव हिने शेवटी स्वतःचा उल्लेख 'पश्चाताप पावलेली दयाळू पंचाची कन्या' असा केलेला आहे. आणि कर्मठ परंपरेच्या जोखडाविरुद्ध संताप व्यक्त केलेला आहे. पुढे या शिवूबाईंच्या विवाहास मान्यता दिल्याचा ठराव सर्वानुमते पास झाला. सुधारक वृत्तीच्या गणपती गायकवाड या तरुणाशी शिवूबाईचा विवाह झाला. शिवूबाईने त्या काळात आपली व्यथा मांडून स्त्री अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा हक्क बजावलेला आहे. त्याचीच परिणीती म्हणून एका मुरळीचा विवाह होणे ही ऐतिहासिक अशी समाज परिवर्तनाचीच घटना घडून आलेली आहे.

**तुळसाबाई बनसोड –**

आंबेडकरी चळवळीतील महत्त्वाचे पत्रकार व कार्यकर्ते गुरुवर्य किसन फागोजी बनसोड यांच्या तुळसाबाई बनसोड या पत्नी होत. तुळसाबाईंना आंबेडकरी चळवळीत सहभागी करून घेण्यासाठी किसन बनसोड यांनी त्यांना प्रथम शिक्षित केले. त्यासाठी परांजपे यांच्या आश्रमात तुळसाबाईंना दिड-दोन वर्ष त्यांनी ठेवले. तेथे राहून शिक्षणाबरोबरच तुळसाबाई सुसंस्कृत झाल्या. प्रार्थना गीते शिकल्या. महर्षी शिंदे यांच्या कार्याचाही त्यांच्यावर प्रभाव होता. आपल्या पतीच्या कार्यात त्यांनी स्वतःला झोकून दिले. छापखान्यात पतीला त्या मदत करू लागल्या. किसन बनसोड यांची मुद्रिते तपासून पेज बांधून काढायचे, पेज पट्टयाला शाई ओतायची, हॅण्डल फिरवला की छापलेला कागद दूर जाऊन पडायचा तो उचलून तो निरखून पहायचा यासारखी कामे त्या निष्ठेने करत असत. छपाईच्या कामानंतर वृत्तपत्रांना मोड पाडून त्या देत असत. पतीची गाणी म्हणून तुळसाबाईंनी त्यांना साथ दिली. स्वतःही त्या गाणी रचू लागल्या. नागपूरच्या पाचपावली भागात बनसोड यांनी जेव्हा शाळा काढायचे ठरवले होते तेव्हा आर्थिक प्रश्न समोर आला. त्यावेळी तुळसाबाईंनी आपल्या अंगावरील दागिने त्यांच्या स्वाधीन केले आणि गावात शिक्षणास प्रारंभ झाला. खेड्यापाड्यामधून अनेक महिलांना आपल्या कार्यातून त्या जागृत करत असत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अंधश्रद्धेविरुद्ध जागृती करताना अनेक अमानुष प्रथेविरुद्ध हल्ला चढवला होता. त्याचा परिणाम होऊन ही प्रथा संपुष्ट करण्यासाठी आंबेडकरी चळवळीतील अनेक कार्यकर्त्यांनी त्याविरुद्ध आवाज उठवला. त्यामध्ये तुळसाबाई बनसोड यासारख्या महिलांनी या प्रथेविरुद्ध जागृतीपर भाषणे केली होती.३

**शांताबाई दाणी –**

नाशिकमध्ये जन्मलेल्या शांताबाई दाणी यांचे बालपण अतिशय प्रतिकूल परिस्थितीत गेले. त्यांच्या व्यसनी वडिलांनी दुसरे लग्न केले असल्याने अत्यंत हाल सोसून शांताबाईंना आईने शाळेत घातले होते. एका सवर्ण शिक्षकांच्या मदतीने ट्रेनिंग स्कूलमध्ये त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था झाली. १९४२ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याची शांताबाईंना ओळख झाली आणि विद्यार्थीदशेतच सामाजिक कार्यात त्या ओढल्या गेल्या. शांताबाई दाणी म्हणतात की, "आम्ही अस्पृश्यांनी बाबासाहेबांच्या भाषणातील प्रत्येक शब्द प्रेरणा म्हणून घेतला त्यांच्या शब्दांनी आम्हाला ओळख, स्वाभिमान, स्वातंत्र्य आणि अन्यायाविरुद्ध लढण्याचे बळ दिले. आपण असे म्हणू शकतो की, त्यांच्या शब्दाने आपले मन आपले व्यक्तिमत्व घडवले"४ अस्पृश्य महिला नेतृत्वात त्या नेहमी आघाडीवर असत. अस्पृश्य महिलांच्या स्थितीत सुधारणा घडवून आणणे, बाबासाहेबांचे विचार सर्वत्र खेडोपाडी पोहोचवणे, अज्ञानी समाजाला जागृत करणे यासाठी लढे, सत्याग्रह, आंदोलनात पुरुषांच्या बरोबरीने शांताबाई भाग घेत असत. सततच्या तुरुंगवासामुळे त्यांना महाविद्यालयीन शिक्षण अर्धवट सोडावे लागले होते. विद्यार्थीदशेत आपल्या परीक्षेच्या आदल्या दिवशी समाजकार्याला प्राधान्य देऊन स्वार्थ त्याग करणारी शांताबाई विरळीच!

भूमिहीनांच्या सत्याग्रहामध्ये तुळसाबाईंनी शेतकऱ्यांचे प्रश्न मांडले. शेतमजुरांच्या सत्याग्रहात सहभागी झाल्याबद्दल त्यांना कोर्टकचेऱ्या कराव्या लागल्या. तुरुंगवास भोगावा लागला. तुरुंगात आल्यावर तुळसाबाईंना भेदभावाची वागणूक मिळाली. इतर सत्याग्रहींपासून त्यांना दूर ठेवले गेले. या अनुभवाचा त्यांनी बोलताना एके ठिकाणी निर्देश केला आहे. समाजकार्यात स्वतःला अखंड वाहून घेताना अनेक समित्यांवर त्यांची नियुक्ती झाली राजकारणातील आपल्या अनुभवाबद्दल त्या व्यक्त होताना म्हणतात, 'या पुरुष अधिकाऱ्यांच्या मनात 'शेवटी स्त्री ही स्त्रीच!' असली भावना कायमची घर करून बसलेली दिसते. स्त्रीचा खंबीरपणा ते मानायलाच तयार नसतात. त्यांना वाटतं स्त्रिया म्हणजे कोती बुद्धी! स्त्रिया म्हणजे प्रलोभन. तिच्या कोमल भावनांना आव्हान केलं की, आपणास हवा तो फरक दिसणार अशी त्यांचे विचित्र कल्पना!..' (स्त्री दिवाळी

अंक, नोव्हेंबर १९७०) राजकारणात तर अहंकाराने भरलेले अनेक पुरुष मोठा राजकारणात मला पुष्कळदा पहावयास मिळतात स्वार्थ पुरुष१९६८ ते १९७४ या कालखंडात महाराष्ट्र विधानसभेच्या त्या अध्यक्षा होत्या. अनेक महत्त्वाच्या समित्यांवर त्यांची नियुक्ती झाली.

अतिशय खंबीर नेतृत्व असणाऱ्या शांताबाईंनी काव्य लेखनातही स्वतःला वाहून घेतले. त्या म्हणतात,

"धनिकांच्या सदनात पक्वान्न- पंगती उठती.
भुकेचा डोंब उदरी, पोरे झोपडीत रडती.
दुःखे अनंत उरी कशी घालावी रांगोळी.
दैन्य घरात पसरे पेटे अंतरात होळी."

श्रीमंत- गरीब ही विषमतेची दरी आणि समाजातील कटू सत्य त्यांनी कवितेत मांडले आहे.

"येई झनी परतुन पाखरा! लावूनी जाशी का रे.
मत्स्यौख्यही घेऊन तव प्रीतीने जीव मोहरला.
निघूनी जाशी परि तू आजला. दुनिया उजाड करून"५

विरहाने कासावीस झालेल्या मनातील आशा सफल व्हावी ही इच्छा कवयित्री व्यक्त करते. आंबेडकरी चळवळीची ही रणरागिणी प्रसंगी हळुवार कोमलही बनते हे यातून प्रकट होते.

**सुलोचनाबाई डोंगरे -**

सुलोचनाबाई डोंगरे या आंबेडकरी कार्यकर्तीच्या अध्यक्षतेखाली १९४२ रोजी अखिल भारतीय बहुजन महिला परिषद आयोजित केली होती. या परिषदेत सुमारे २५००० स्त्रियांचा सहभाग होता. या परिषदेत सुलोचनाबाई डोंगरे यांनी सर्वांना संबोधित करताना आपले स्त्री शिक्षणावरील विचार मांडले. बालकांचे 'स्वास्थ्य व संतती नियमन' या प्रश्नांवर त्यांनी या परिषदेतून राष्ट्रव्यापी आवाहन केले. स्त्रिया सुशिक्षित झाल्या तर त्यांना कुटुंब नियोजनाचे महत्त्व कळेल. वारंवार येणाऱ्या मातृत्वाने स्त्रियांच्या आजारपणात वाढ होते. सुदृढ संतती निर्माण होऊ शकत नाही. त्यामुळे त्या म्हणतात, "एक महत्त्वाचा प्रश्न म्हणजे जन्म नियंत्रणाचा यासंदर्भात सुशिक्षित महिला यशस्वी होऊ शकतात कारण त्यातील वाईट गोष्टी त्यांना कळू शकतात. आईच्या आरोग्याच्या किमतीवर आजारी, आजारी आणि अशिक्षित मुलांचा गुणाकार करून उपयोग नाही. हे वाईट थांबवण्यासाठी प्रत्येक स्त्रीने या प्रश्नाचा गांभीर्याने विचार करून लवकरात लवकर कारवाई करावी. या समस्येचे निराकरण करण्यासाठी स्त्री शिक्षण व्यापक प्रमाणात आवश्यक आहे. शिक्षणाच्या बाबतीत आपण अजूनही मागासलेले आहोत. आजची मुलगी उद्याची आई आहे. पाळणा हलवणारी ती जगाला मुक्त करते त्यामुळे मुलींना शिक्षण देणे गरजेचे आहे. मुलीला मुलांचे संगोपन कसे करावे हे माहीत असले पाहिजे. शिक्षण नसेल तर गुण आणि कलागुण विकसित होऊ शकत नाही. धर्माच्या बाबतीत आपण हिंदू धर्माच्या पलीकडे जाण्याचा प्रयत्न केला पाहिजे. वीस आमदारांमध्ये अनेक जण अशिक्षित आहेत त्यापैकी काही जागा आमच्या सुशिक्षित महिलांना दिल्या असत्या तर आमची परिस्थिती सुधारता आली असती."६ या परिषदेत प्रथमत: एका आंबेडकरी महिलेने स्त्री शिक्षण व जन्म नियंत्रणाचे महत्त्व अधोरेखित केले आहे या परिषदेत काही ठराव सर्वानुमते मांडण्यात आले ते असे-

१ बहुपत्नीत्वाची प्रथा स्त्रियांसाठी अन्यायकारक असून त्यासाठी कायद्यात बदल करणे आवश्यक आहे
२. मजूर महिलांच्या प्रासंगिक रजेसाठी व दुखापतीच्या भरपाईसाठी कायदे करणे.
३.गिरणी महिला कामगारांसाठी महिला पर्यवेक्षकांची नियुक्ती करणे.
४.अखिल भारतीय अनुसूचित जाती महिला महासंघाची स्थापना करणे.
५. स्त्री शिक्षणात सुधारणा करण्यासाठी अनुसूचित जातीच्या महिला विद्यार्थ्यांसाठी शिक्षण अनिवार्य करणे वसतीगृहाची सोय करणे व उच्च शिक्षणासाठी त्यांना शिष्यवृत्ती देणे.

**जाईबाई चौधरी –**

जाईबाई चौधरी यांचे प्राथमिक शिक्षण आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते किसन फागुजी बनसोडे यांच्या शाळेत झाले. लग्नानंतर घरच्या परिस्थितीमुळे मध्येच शिक्षण सोडून त्यांना हमाली करावी लागली. एका मिशनरी ननच्या सहाय्याने त्यांनी पुढचे शिक्षण पूर्ण केले व मिशनरी शाळेतच त्या शिक्षिका म्हणून रुजू झाल्या. पण अस्पृश्य शिक्षिका म्हणून शाळेत त्यांना अपमानास्पद वागणूक मिळाली. मुलांनी शाळेत येणे बंद केले. येथेच त्यांच्या मनात क्रांतीची ठिणगी पडली व स्वतःच अस्पृश्य मुलांसाठी शाळा सुरू करण्याचे त्यांनी ठरवले. सावित्रीबाई फुले व फातिमा शेख यांच्यानंतर मुलींसाठी शाळा सुरू करणाऱ्या त्या एकमेव महिला होत. त्यांनीच शाळा शिक्षिकेचे काम केले नंतर त्या शाळेच्या मुख्याध्यापिका बनल्या. १९२२

रोजी नागपूर मध्ये 'संत चोखामेळा कन्या पाठशाळा' नावाची शाळा त्यांनी सुरू केली. पालकांनी मुलींना शाळेत घालावे यासाठी त्यांचे मन वळविणे, घरोघरी जाऊन त्यांना शिक्षणाचे महत्त्व समजावून देणे, शिक्षणाचा प्रसार करणे हेच त्यांनी आपले जीवित ध्येय मानले. शिक्षणाबद्दल त्या जात्यावरची गाणी म्हणू लागल्या, मुलींचे प्रबोधन करणे त्यांना स्वच्छतेचे धडे देणे, वेणीफनी करून मुलींना त्या शिक्षण देऊ लागल्या. १९३० मध्ये भरलेल्या अखिल भारतीय दलित काँग्रेसच्या पहिल्या अधिवेशनात स्त्री पुरुष समानतेचा विचार त्यांनी मांडला. १९३७ रोजीच्या अखिल भारतीय महिला परिषदेचे त्यांना आमंत्रण मिळाले. तेथे सवर्ण महिलांकडून त्यांना जातियवादाचा अनुभव मिळाला. सवर्ण महिलांनी त्यांच्या जेवणासाठी वेगळी सोय केली होती. या भेदभावपूर्ण वागणुकीचा निषेध करण्यासाठी त्यांनी १ जानेवारी १९३८ रोजी एक बैठक आयोजित केली. उच्चवर्णीय महिलांकडून अस्पृश्य महिलांना अन्यायकारक वागणूक मिळत होती. त्यासाठी 'रमाबाई महिला संघाची' त्यांनी स्थापना केली. व अस्पृश्य महिलांसाठी रात्रशाळा सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. १९२२ साली जाईबाईंनी उभ्या केलेल्या शाळेचे नामकरण आता 'जाईबाई चौधरी ज्ञानपीठ उच्च माध्यमिक शाळा' असे झालेले आहे. जाईच्या या छोट्याशा रोपाचे वटवृक्षांमध्ये रूपांतर झाले आहे.

**विठाबाई काळे –**

कोल्हापूर भागातील आंबेडकरी चळवळीमध्ये भाग घेणाऱ्या विठाबाई काळे यांना समाजसुधारणेचा ध्यास होता. विठाबाई या अंधश्रद्धा व देवदासी प्रथेला विरोध करत असत. 'बौद्ध महिला भजनी मंडळा'च्या त्या अध्यक्षा होत्या. भजनाच्या माध्यमातून त्यांनी समाजाचे प्रबोधन केले आहे. त्याचबरोबर भूमिहीन सत्याग्रह, भाववाढ विरोधी मोर्चे, पद्माराजे दत्तक प्रकरण, मराठवाडा नामांतर आंदोलने, महाराष्ट्र- कर्नाटक सीमा प्रश्न आंदोलन इ. सामाजिक गोष्टीतही त्यांचा सक्रिय सहभाग असे. त्यादरम्यान त्यांना अनेक वेळा अटक झाली होती. 'रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया'च्या महिला नेत्या म्हणून कोल्हापूर जिल्ह्यामध्ये त्या लोकप्रिय होत्या.

**समारोप –**

अशा प्रकारे आंबेडकरी चळवळीत महाराष्ट्रातील अनेक महिलांनी आपले वैचारिक योगदान दिलेले आहे. त्या योगदानाशिवाय व समर्पणाशिवाय ही चळवळ अशक्य आहे. आंबेडकरी चळवळीतील स्त्रियांच्या या सहभागामुळे अनेक उद्दिष्टे साध्य झाली आहेत.

१.सार्वजनिक सभा परिषदांमध्ये महिलांचा सहभाग वाढला.

२.महिला संघटनांची निर्मिती झाली.

३.महिलांचे साहित्यिक योगदान वाढले.

४.आर्थिक मदतीसाठी स्त्रियांची चळवळ पुढे ठाकली

५.स्त्रियांचा स्वाभिमान जागृत झाला.

६. अस्पृश्य समाजात स्त्री साक्षरतेचे प्रमाण वाढले

याचेच प्रत्यंतर म्हणून आज सर्व क्षेत्रात महिलांची उल्लेखनीय प्रगती आपणास दिसून येत आहे.

**संदर्भसूची :**

१. सोमवंशीय मित्र, नोव्हेंबर १९०१.

२. (सोमवंशीय मित्र १९०८) ढोर चांभार स्त्रियांच्या आंबेडकरी जाणिवांचा परिघ- सुनिता सावरकर, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, दु. आ, २०२४ पृ.१६.

३.गुरुवर्य बनसोड- ना.रा.शेंडे, शेष प्रकाशन १९८७

४. आंबेडकर दलित महिला साहित्य आणि जीवनात आंबेडकर योगेश मैत्रेय ३१ डिसेंबर २०१९, इंडियन कल्चरल फोरम,www.google.com

५ वादळाचे वंशज- गंगाधर पानतावणे प्रचार प्रकाशन, कोल्हापूर प्र. आ. पृ.१०८-१०९

६.सुलोचनाबाई डोंगरे: दलित स्त्रीवादी ज्यांनी जन्म नियंत्रण आणि स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला, संपादक सुचित्रा www.google.com

७. सकाळ, मंगळवार दि. १३ फेब्रुवारी १९९६, संपा. वसंत लिंगनुरकर